# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १०४** **दिनांक- १६/०४/२०२१**

## भारतीय व परदेशी नागरीकांच्या क्रेडीट कार्डची माहिती चोरुन विमान तिकीटे व पंचतारांकीत हॉटेल बुकींग करुन फसवणुक करणा-या टोळीला सायबर गुन्हे शाखेकडुन अटक.

दिनांक ०३/०४/२०२१ रोजी सायबर गुन्हे शाखेचे अधिकारी सपोनि/श्री.प्रविण स्वामी यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडुन अशी बातमी मिळाली कि, आरोपीत नामे समीर कासीम शेख हा त्याने भाडेतत्वावर मिरारोड येथे रुम घेवुन त्याचे साथीदारांसोबत भारतीय तसेच परदेशी नागरीकांच्या क्रेडिट/डेबिट कार्डाची माहिती घेवुन तसेच नागरीकांचे बनावट आधारकार्ड व इतर कागदपत्रे बनवुन त्याद्वारे विमान तिकीटे व पंचतारांकीत हॉटेल बुकिंग करुन ती तिकीटे इतर ट्रॅव्हल्स एजंटना कमी किमतीत विकत आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने वरीष्ठांची परवानगी घेवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम सेल व मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी छापा टाकुन आरोपीतांकडुन दोन लॅपटॉप, १४ मोबाईल, ५५ सिमकार्ड, २५ बनावट आधारकार्ड, ११ चेकबुक, १३ क्रेडीट/डेबिट कार्ड व क्रेडीट/डेबिट कार्डाची माहिती लिहलेल्या २४ वहया, असा मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेण्यात आला आहे.

सदरबाबत काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा.रजि.नं २६८/२०२१ भादविस ४१९, ४२०,४६५, ४६७,४६८,४७१, १२० (ब), सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००५ चे कलम ६६ (क), ६६(ड) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाची व्याप्ती व आरोपी समीर शेख यांचेवर यापूर्वी किंगफिशर कंपनीला तसेच अन्य कंपन्यांना फसविलेबाबतचे एकूण चार गुन्हे १) आर्थिक गुन्हे शाखा मुंबई गु.र.नं १३१/२००६ २) मेघवाडी पोलीस ठाणे गु.र.नं ६१/२००८ ३) वर्सोवा पोलीस ठाणे गु.र.नं १२०/२००८ ४) गुन्हे अन्वेषण शाखा युनिट-०१ मुंबई गु.र.नं १२७/२०१२ दाखल आहेत.

सदर गुन्हयांची व्याप्ती लक्षात घेवून श्री सदानंद दाते, मा.पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी श्री.रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त यांच्या अधिपत्याखाली विशेष तपास पथकाची स्थापना केली.

विशेष तपास पथकाकडुन केलेल्या तपासात सन २०१८ पासुन आरोपीत समीर शेख हा काही व्यक्तीकडुन क्रेडिट कार्डचा डेटा गैरमार्गाने प्राप्त करुन तसेच इतरांचे नावे मोबाईल सिमकार्ड घेवुन क्रेडीट कार्डाच्या डेटाचा उपयोग करुन अंतराष्ट्रीय व अंतरदेशीय विमान तिकीटे व बनावट आधारकार्डाव्दारे पंचतारांकीत हॉटेल बुकींग करुन कमी किमतीमध्ये ग्राहकांना विकत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

Scanned with CamScanner

विमानाची तिकीटे बुकींग करण्यासाठी मोबाईल सिमकार्ड विक्रेता याचे मदतीने ग्राहकांच्या संमतीशिवाय त्यांचे आधारकार्डाचा वापर करुन मोबाईलचे सिमकार्ड मिळवुन वापर केल्याचे तसेच इतर अटक व पाहिजे आरोपीत यांनी सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत समीर शेख यास गैरमार्गाने क्रेडीट कार्डाचा डेटा पुरविणे व विमानाची तिकीटे स्वत:च्या फायदयासाठी बुकींग करण्यासाठी मदत केल्याचे निष्पन्न झाले आहे.

अटक आरोपीताकडुन जप्त करण्यात आलेल्या वहयामध्ये भारतीय व परदेशी बँकेचे ४७१८ क्रेडीट कार्डचा डेटा मिळुन आला असुन त्याचा त्याने वापर करुन विमान व हॉटेलची तिकीटे बुक केली आहेत. त्याच्या मोबाईल व हार्डडिस्कमध्ये सुमारे १००० पेक्षा जास्त अंतरराष्ट्रीय व अंतरदेशीय विमानाची तिकीटे तसेच पंचतारांकीत हॉटेल बुकींग केल्याचे दिसुन आले असुन आरोपींना महाराष्ट्र व इतर राज्यातील ट्रॅव्हल एजंट मदत करत असल्याने त्यामधील १) वसीम कासीम शेख रा. किस्मत कॉलनी, कौसा मुंब्रा जि.ठाणे. २) अब्दुल हमीद अब्दुल रहिम बाशा शेख रा. सुलताना व्हिला, कौसा मुंब्रा जि.ठाणे. ३) ईस्माईल अशरफ काझी रा. नजीज प्लाझा, कौसा मुंब्रा जि.ठाणे यांना अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीत समीर कासीम शेख याला क्रेडीट कार्डाचे डेटा पुरविणारे इसम नामे स्टीफन फ्रान्सीस डिसोजा रा. मिरारोड हा मालाड येथील कॉलसेंटर येथे कामाला आह. तो तेथील युके व अमेरीकेतील शॉपींगसाठी कॉल करणा-या कस्टमरचा डेटा घेवुन तो समीर याला पुरवीत असल्याने त्याला मिरारोड येथुन अटक करण्यात आली आहे. तसेच अमेय अरुण लोकरे हा बिटकॉईनद्वारे डार्कनेटवर जावुन डेटा खरेदी करुन पुरवीत असल्याचे समीर याने सांगितल्यावरुन त्यास जयपुर येथुन ताब्यात घेवुन अटक केली आहे.

गुन्हयातील अटक सर्व ६ आरोपींतांकडे विचारपुस केली असता अशाच प्रकारचे गुन्हे केले असल्याने अदयापपावेतो त्यांचेविरुध्द १) हिजंवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.२५५/२०२१ भादविस कलम ४२०,सह माहिती तंत्रज्ञान अधिनीयम २००५ चे कलम ६६(क)(ड) २)मुंब्रा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.३२१/२०२१ भादविस कलम ४२०,३४ ३) मुंब्रा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.३२२/२०२१ भादविस कलम ४२०,३४ ४) मुंब्रा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.३२३ /२०२१ भादविस कलम ४२०,३४ ५) नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.२८५/२०२१ भादविस कलम ४२०,सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००५ चे कलम ६६(क) या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री सदानंद दाते, मा.पोलीस आयुक्त, श्री एस जयकुमार, मा.अपर पोलीस आयुक्त श्री.डॉ.महेश पाटील मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.रामचंद्र देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.जितेंद्र वनकोटी,वरीष्ठ पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती गुन्हे शाखा, श्री.सुजीतकुमार गुंजकर,पोलीस निरीक्षक, श्री.प्रविण स्वामी, सहा.पोलीस निरीक्षक,सायबर गुन्हे शाखा, पोलीस उप निरीक्षक संतोष भिसे , सुरज शिंदे , चेतन पाटील,आनंद भगत, पोशि/२०७२ गणेश ईलग, पोशि/१८१२ प्रविण आव्हाड,नेम- सायबर गुन्हे शाखा, पोशि/३३७५ राजेश श्रीवास्तव, पोशि/३५०२ सतिष जगताप,पोशि/१८६८ महेश वेल्हे, सर्व नेम- मध्यवर्ती गुन्हे शाखा यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास वरीष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी हे करीत आहेत.

Scanned with CamScanner